प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

ऑक्टोबर 3, 2019

**पंजाब अँड महाराष्ट्र को–ऑपरेटिव बँक लि. ह्यांच्या ठेवीदारांसाठी, रिझर्व्ह बँकेकडून निकासी मर्यादेत रु.25,000/- पर्यंत वाढ**

येथे **स्मरण** व्हावे की, भारतीय रिझर्व्ह बँकेने, पंजाब अँड महाराष्ट्र को–ऑपरेटिव बँक लि. च्या ठेवीदारांना, त्यांच्या खात्यांमधील एकूण शिल्लकेमधून रु.10,000/- (दहा हजार) पर्यंतची रक्कम काढण्यास परवानगी दिली होती.

वरील बँकेची तरलता-स्थिती व तिच्या ठेवीदारांना प्रदान करण्याची क्षमता ह्यांचा आढावा घेऊन, भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेच्या तरलता स्थितीचा पुनश्च आढावा घेतला असून आता निकासीची मर्यादा रु.25,000/- (रुपये पंचवीस हजार) करण्याचे ठरविले आहे.

वरील शिथिलतेमुळे, वरील बँकेचे सुमारे 70% ठेवीदार त्यांच्या खात्यातील संपूर्ण शिल्लक रक्कम काढू शकतील. रिझर्व्ह बँक ह्यावर जवळून देखरेख करत असून, वरील बँकेच्या ठेवीदारांच्या हितसंबंधांसाठी आवश्यक ती पाऊले उचलत राहील.

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित, कलम 36 अअ (5)(अ) अनुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेने, प्रशासक, पंजाब अँड महाराष्ट्र को–ऑपरेटिव बँक लि. ह्यांना मदत करण्यासाठी, तीन सदस्यांची एक समिती नेमण्याचेही ठरविले आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/861**